**Akshara Multidisciplinary Research Journal**
**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**Volume 5, Special Issue 2**

**August 2021**

# *Dr. Ambedkar in the Global Context*

**Guest Editor**
**Dr. Mrs. M.V. Waykole**
Principal,
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Executive Editor**
**Dr. A. D. Goswami**
Vice Principal,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Associate Editor**
**Dr. P. H. Ingole**
Head, Dept. of History,
Bhusawal Arts, Science &
P O Nahata Commerce College Bhusawal

**Akshara Publication**
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon (Maharashtra) 425201
Website: www.aimrj.com Email: aimrj18@gmail.com



Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impact- 5.54
Dr. Ambedkar in the Global Context Vol. 5 , Special Issue 02 , August 2021

# Editorial Board

-: Chief & Executive Editor:-

**Dr. Girish Shalik Koli**
Dongar Kathora
Tal.Yawal. Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425301
Mobile No: 0942168261 Email: koligirish@gmail.com

-:Co-Editors :-

- **Dr. Sirojiddin Nurmatov**, Associate Professor, Tashkent Institute Of Oriental Studies, Tashkent City, Republic Of Uzbekistan
- **Dr.Vivek Mani Tripathi**, *Assistant Professor*. Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China
- **Dr.Maxim Demchenko**Associate Professor Moscow State Linguistic University, Institute Of International Relationships, Moscow,Russia
- **Dr.ChantharangsriPhrakhrusangkharak Yanakorn**,Assistance ProfessorSongkhla,Thailand
- **Dr.Mohammed Abdraboo Ahmed Hasan**, Assistance Professor (English) The Republic of Yemen University of Abyan General manager of Educational affairs in University of Abyan ,Yemen.
- **Dr. Vijay Eknath Sonje**, *Assistant Professor* (Hindi) D. N. College, Faizpur [M. S.]
- **Mr. Nilesh SamadhanGuruchal**, *Assistant Professor* (English)Smt. P. K. Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India.
- **Dr. Shaikh Aafaq Anjum**, *Assistant Professor* (Urdu) Nutan Maratha College, Jalgaon. [M. S.]
- **Mr. Dipak Santosh Pawar**, *Assistant Professor* (Marathi)Dr. A.G.D. Bendale Mahila Mahavidyalya, Jalgaon [M. S.] India.

Scientific Journal of Impact Factor (SJIF)
International Impact Factor Services
International Society for Research Activity (ISRA) Journal-Impact-Factor (JIF)

## AMRJ Disclaimer:

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of Akshara's editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it.*



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
AMRJ
Vol. 5 , Special Issue 02 , August 2021
Dr. Ambedkar in the Global Context


| Sr No | *Title of the Paper& Author's Name* | Pg.No |
|---|---|---|
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार-डॉ. नामदेव सोडगीर | 122 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार-श्रीमती निता अरूण पाटील | 124 |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक व सामाजिक विचार -प्रा. उज्वला रामचंद्र महाजन | 128 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाशैक्षणिक दृष्टिकोन-डॉ. बालाजी रामराव गायकवाड | 131 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महाराष्ट्रीयन संत साहित्य-कांबळे सुधाकर ज्ञानोबा | 134 |
| 36 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांचे स्त्री विषयक विचार व स्त्री जागृतीचे कार्य-डॉ.अर्जुन गंगाराम नेरकर | 139 |
| 37 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्याय एक विश्लेषणात्मक अध्ययन-प्रा.वीरेंद्र चौहान | 141 |
| 38 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल- डॉ. विजय घोरपडे / धम्मदीप पंढरी गवळे | 146 |
| 39 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्यायासाठी निर्णायक लढा<br>-प्रा. डॉ. जयेश विक्रम पाडवी | 152 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती क्षेत्रातील विचार: सध्याच्या काळाची गरज<br>-डॉ. प्रतिभा अनिल गाढे | 159 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार-प्रा. सुपारे यु.पी. | 164 |
| 42 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार -प्रा. एस. टी. धुम | 168 |
| 43 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे– पंचतीर्थ- प्रा. डॉ. दिपक शिरसाट | 172 |
| 44 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार -प्रा.निता चोरडिया | 177 |
| 45 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार- प्रा.डॉ. विजय मांटे | 180 |
| 46 | धर्मांतरानंतर जळगाव जिल्ह्यातील बौध्द धर्मीय समाजातील बदल-<br>प्रा. डॉ. प्रशांत एस. देशमुख / किरण बाळु गाढे | 185 |
| 47 | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध विचारांचा मागोवा-<br>प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर | 189 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार-देशमुख पौर्णिमा लक्ष्मण | 193 |
| 49 | अनुसूचित जाती , जमाती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर-प्रा. कमलाकर शरद इंगळे | 198 |
| 50 | डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे भारतीय संघराज्य संबंधीचे विचार-डॉ .सचिन एस वेरुळकर | 200 |
| 51 | डॉ. भीमराव अम्बेडकर का सामाजिक चिन्तन-प्रा. डॉ. मनोज एन. पाटील | 205 |




Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impact- 5.54
Dr. Ambedkar in the Global Context
Vol. 5 , Special Issue 02 , August 2021

36

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार व स्त्री जागृतीचे कार्य

डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
म.स.गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव, (नाशिक)
E-mail.Id- nerkarag2013@gmail.com (Mob.No.9765362770)

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य या देशाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान आहे. प्रकांड पंडित, समाजशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ, भारतीय लोकशाहीतील उद्धारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ख्याती असली तरी स्त्री उद्धाराचे क्षेत्र देखील त्यांच्या नजरेतून सुटले नाही. स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रीयांना जाचक रुढी आणि परंपरांपासून सुटका मिळावी यासाठी 'हिंदू कोड' बिल मसुदा लिहिला होता. हा मसुदा २४ फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत बाबासाहेबांनी मांडला. यात बाबासाहेबांनी भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक रूढी परंपरेपासून कशी सुटका करता येईल यासंदर्भात हा मसुदा लिहिला आहे. हा मसुदा लिहिण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ४ वर्ष १ महिना आणि २६ दिवस हे हिंदू कोड बिल तयार करण्यासाठी लागले. खरं तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय नारी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून मानव म्हणून जगण्याचा हक्क देणारे ते दिलदार विचारवंत होते. मानसिक, सामाजिक, गुलामगिरी व स्त्रीला नाकारलेले मानवी हक्क आधुनिक काळात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न ज्योतिबा फुले यांनी केला. त्याच महात्मा फुलेना गुरु मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांची अंमलबजावणी व्हावी या हेतूने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना तयार करतांना 'हिंदू कोड' बिल सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ते बिल मंजूर व्हावे असा आग्रह धरला.

डॉ. आंबेडकरांनी तयार केलेला 'हिंदू कोड' बिल म्हणजे स्त्रियांच्या मानवी हक्काची सनद आहे असंच म्हणावं लागेल. खरं तर डॉ. बाबासाहेब व्यवसायाने वकील होते. कायद्याचे ज्ञान बाबासाहेबांच्या नसानसात भरले होते. त्यातच स्त्री ही यशस्वी आणि सुखी कुटुंबाचा पाया आहे. पुरुषाच्या बरोबरीने स्त्रियांनाही समान हक्क मिळाले पाहिजे. परंपरागत चालत आलेल्या रुढी कुठेतरी संपवल्या पाहिजेत. हाच उदात्त हेतू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी डोळ्यासमोर ठेवून या हिंदू कोड बील कायदा मंत्री असल्याने त्यांना नेहमी असे वाटत होते की, " जाती व्यवस्थेमध्ये स्त्रीयांना कमी लेखले जात आहे. त्यासाठी हिंदू कोड बिल हे असे बनले पाहिजे ज्यामुळे देशातील सर्व स्त्रीयांना समान अधिकार प्राप्त होतील".१

स्त्री ही माणूस आहे. ती देखील मानवी समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे तिची दुर्दशा करून कोणत्याही मानवी समाजाला स्वतःचा सुसंस्कृतपणा सिद्ध करता येणार नाही. यांची जाणीव डॉ. बाबासाहेबांनी करून दिली आहे. स्त्रियांना सर्वत्र दुय्यम स्थान दिले गेले आहे. त्यामुळे तिच्या वाटेला नेहमी दास्यत्व आले आहे. तिच्या या दुःखाचा भोगवटा विलक्षण आहे. तो कमी झाला पाहिजे, स्त्रियांचे सर्व स्तरावर शारीरिक व मानसिक शोषण सुरू आहे. आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीने तिला माणूसपणापासून सोडून टाकले आहे. सवर्ण समाजातील स्त्री असो की, शूद्र समाजातील असो तिच्या वाटेला दुःख, शोषण, अपमान, दास्यत्व, हीन वागणूक अशा प्रकारचे जीवन स्त्रीला भोगावे लागते आहे. या सर्व परिस्थितीतून स्त्रियांना बाहेर काढले पाहिजे याच अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या शोषित आणि पीडित स्त्रियांच्या मुक्तीसाठी, उत्थानासाठी कायद्याची आवश्यकता वाटत होती. म्हणून महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी बाबासाहेबांनी पाच हजार स्त्रीयांची वेगळी सहभाग घेऊन त्यांचे प्रबोधन केले. स्त्री आणि पुरुष ते समाजातील व कुटुंबाचे मुख्य घटक आहेत. दोघांनी मिळून समाजाच्या, संसाराच्या अडचणी त्यांनी सोडवल्या पाहिजेत. कोणतेही काम पुरुषाच्या अंगावर जर दिले तर ते काम करण्यासाठी त्याला जो वेळ लागतो, त्यापेक्षा तेच काम स्त्रियांच्या अंगावर गेले तर निश्चितच पुरुषापेक्षा स्त्रीया ते काम लवकर करतात असे प्रखर विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या सभेत व्यक्त केले. दलित



Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

स्त्रीयांनी आपल्या राहणीमानात बदल केला पाहिजे, स्त्रियांची गुलामगिरी संपली पाहिजे, समाज क्रांतीमध्ये स्त्रियांची भूमिका निर्णायक आहे, अशी बाबासाहेबांची मनोकामना होती. त्यामुळे १९३८ मध्ये कुटुंब नियोजनाची आवश्यकता पटवून दिली. स्त्रीयांनी कुटुंब नियोजन जर समजून घेतले तर स्त्रियांची उन्नती होण्यास फारसा वेळ लागणार नाही. हे देखील बाबासाहेबांनी पटवून दिले आहे. कुटुंब नियोजनाचे फायदे व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "जास्त अपत्यांमुळे स्वास्थहानी होते, व्यक्तिमत्व विकास खुंटतो, स्त्रियांची बाळंतपणाच्या यातनांपासून सुटका व्हावी, तिची शक्ती समाजकार्यासाठी खर्च व्हावी, साहित्य व कला याची निर्मिती तिच्या हातून व्हावी, बौद्धिक विकास करण्यासाठी वेळ मिळावा, तिने केवळ 'चूल व मूल' यात गुंतून पडू नये, ही भूमिका कुटुंबनियोजनाची होती".२

आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी असंख्य दलित स्त्रिया गिरण्या, कारखाने, मिल मध्ये कामाला जातात. परंतु या कामामध्ये पुरुषांच्या बरोबरीने तिलाही समान वेतन मिळाले पाहिजे, बाळंतपणाच्या कालावधीत तिला पगारी रजा मिळाली पाहिजे, कामाच्या ठिकाणी पाळणा घराची निर्मिती झाली पाहिजे, अशा अनेक सुधारणा बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या या सभेत व्यक्त केल्या. या सभेत वीस-पंचवीस हजार स्त्रियांना पाहून डॉ. बाबासाहेबांना खूप आनंद झाला. "एखाद्या समाजातील स्त्रीयांच्या प्रगती वरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. महिलांची संघटित संस्था असावी, यावर माझा विश्वास आहे. सामाजिक दुर्गुण नाहीसे करण्यात त्यांची फार मोठी सेवा आहे. दलित समाजाचे कार्य हाती घेतले, तेव्हाच मी निर्धार केला होता की, पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीला ही पुढे नेले पाहिजे".३ मानवाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे त्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. "वाचाल तर वाचाल" या उक्तिच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" असा मंत्र दिला. बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले आहे. कारण जो मनुष्य हे प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असा दृढ विश्वास होता. मानवी जीवनातील अंधार, अज्ञान, अंधश्रद्धा जर दूर करायचे असतील, तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणामुळे पुर्ण जीवनच उजळून निघते याची खात्री असल्याने बाबासाहेबांनी अनेक शिक्षण संस्था स्थापन केल्यात.

**हिंदू कोड बिल कायद्यातील ठळक वैशिष्ट्ये:-**

१. वडिलांच्या संपत्ती मध्ये मुलांच्या बरोबरीने मुलीला समान हिस्सा दिला.
२. पतीच्या निधनानंतर पत्नीला वारसा हक्क यात आर्थिक स्वातंत्र्याची कल्पना होती.
३. मुलीला देखील दत्तक घेता येणे व पत्नीला मूल दत्तक घेण्याचा अधिकार, दत्तक घेताना पत्नीची संमती कलम स्त्री-पुरुष समानतेसाठी नमूद केलेले दिसते.
४. आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता. तसेच जाती बाहेरचा दत्तक घेतल्यास त्याला कायदेशीर मान्यता.
५. माणसाचे मुल्य तो कुठे जन्माला आला या आधारे न ठरवता त्याचा जीवन कर्म यावरून ठरवावे.
६. स्त्रियांना समान नागरी कायदा प्राप्त झाला पाहिजे.
७. मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे.
८. नोकरीच्या ठिकाणी समान वेतन मिळाले पाहिजे.
९. बाळंतपणाच्या कालावधीत पगारी रजा मिळाली पाहिजे.
१०. कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावीत.
११. स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार दिला.
१२. नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळावी.
१३. व्यक्तीचा एक विवाह कायदेशीर असल्यास दुसरा विवाह योग्य कारण नसल्यास अवैध ठरवून स्त्रीला स्थैर्य दिले.
१४. स्वतःच्या मिळकतीवर स्त्रियांचा अधिकार दिला.
१५. स्त्री शिक्षण देशाचा व समाजाच्या उन्नतीचा पाया आहे.
१६. स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेली समान संधी.

इत्यादी अनेक गोष्टींना कायद्याचे रूप देण्याचा प्रयत्न हिंदू कोड बिलाच्या रूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंजूर करून घेतला आहे.



Scanned by CamScanner

AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
E- ISSN 2582-5429
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
Dr. Ambedkar in the Global Context
SJIF Impact- 5.54
Vol. 5 , Special Issue 02 , August 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना या हिंदू कोड बिलाचा फायदा होईल याची चिंता नव्हती. त्यांना सर्व जाती आणि धर्माच्या स्त्रियांच्या अधिकाराचे संरक्षण करण्याच्या उदात्त हेतू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते की, 'देशाच्या विकासासाठी सर्व वर्गातील लोकांना समानतेचा अधिकार भेटला पाहिजे" या बीला मध्ये स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार त्याच वेळेस विधवा आणि मुलींना संपत्ती मध्ये अधिकार असावा असा प्रस्ताव ठेवला होता. यामध्ये ज्यांनी आपले मृत्युपत्र बनवले नसेल त्या व्यक्तीच्या संपत्तीमध्ये हिंदू स्त्री आणि पुरुषांना प्राप्त होणारी संपत्तीत कायद्याने वाटणी झाली पाहिजे. असा प्रस्ताव सादर केला या कायद्यानुसार मयत झालेल्यांच्या सर्व मुलगे व मुलींना समान वाटणीचे अधिकार देण्यात येतात.

**हिंदू कोड बिल मधील आठ अधिनियम बनले आहेत.**

१. हिंदू विवाह अधिनियम.
२. विशेष विवाह अधिनियम.
३. दत्तक घेणे, दत्तकग्रहण अल्पायु-संरक्षण अधिनियम
४. हिंदू वारसदार अधिनियम
५. दुर्बल आणि साधन ही कुटुंबातील सदस्यांना भरण पोषण अधिनियम.
६. अप्राप्तवय संरक्षण संबंधी अधिनियम
७. वारसदार आधिनियम
८. हिंदू विधवा पुनर्विवाह अधिकार अधिनियम.

अशा प्रकारे या बिलामध्ये हिंदू स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार देण्यात आला होता. हे बिल अशा अनेक प्रथांना हिंदू धर्मापासून दूर करत होते ज्याला परंपरेच्या कट्टरवादी सनातनी जिवंत ठेवू इच्छित होते. त्यामुळे या बिलाला जोरदार विरोध झाला. हे बिल पास करण्यासाठी ९ एप्रिल १९४८ ला कमिटीसमोर ठेवण्यात आले. दुर्दैव हे की,या बिलास नेहरूजींचे समर्थन असून देखील हे बिल संविधान सभेत प्राप्त होऊ शकले नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खूप दुखावले गेले. त्यांनी आपल्या स्वच्छंदी मनाला खुप लावून घेतले आणि आपल्या पदाचा राजीनामा दिला. पहिल्या लोकसभा निवडणुकीनंतर टप्प्याटप्प्याने हे बिल भारतीय संसदेत मंजूर करण्यात आले. आज डॉ. बाबासाहेबांची 'हिंदू कोड' बिलाची संकल्पना सत्यात उतरली आहे हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री हिताचे यश आहे.

**सारांश**:-अशाप्रकारे जगाला मानवतेचा संदेश देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्य अथांग होते. सर्व जगाने बंधुत्वभावाचे, समाधानाचे आयुष्य जगावे असा आशावाद आहे. देशातील प्रत्येक नागरिकाने वर्ग, जात, धर्म, प्रदेश, संप्रदाय, लिंग यांच्या पलीकडे जाऊन माणूस व त्याचे कल्याण याचा प्रत्येकाने ध्यास घेतला पाहिजे. आपल्या भारताचे स्वातंत्र्य अबाधित राहावे, सर्व लोकांमध्ये एकोपा निर्माण व्हावा, यासाठी प्रत्येकाने आपल्या आयुष्यात झिजवावे, असे अमूल्य विचार बाबासाहेबांनी व्यक्त केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय स्त्री ही स्वतंत्र असावी. ती अज्ञान व अंधश्रद्धेतून मुक्त झालेली असावी, पारंपारिक रूढी-परंपरेचा तिने त्याग करून त्याला तिलांजली द्यावी. आपण देखील समाजाचा एक घटक आहोत, अशी पात्रता तीने निर्माण करावी, सर्व क्षेत्रात न्याय मिळवून देणारी तिची कुवत समाजाला दाखवावी, अशी सक्षम स्त्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित आहे. अशा रीतीने स्त्रियांना याहीपेक्षा अधिक सक्षम व्हायचे असेल, तर बाबासाहेबांच्या विचारांचा, त्यांच्या शिकवणीचा ध्यास डोळयासमोर ठेवून बाबासाहेबांविषयी कृतज्ञता पूर्ण प्रमाण करणे आमचे कर्तव्य आहे. बाबासाहेबांच्या विचारांची मशाल हातात घेऊन स्त्रीयांनी आपले जीवन सुकर व आनंदमय करावे एवढीच भाबडी अपेक्षा.

संदर्भ :-

१. वर्तमान परिस्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आवश्यकता- डॉ. एम. आर. इंगळे
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार शोध आणि बोध- डॉ. मंदा मोरे- थोरात

■ ■ ■



Scanned with CamScanner
Scanned by CamScanner